Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मंगला गोडबोले यांच्या स्त्रीकेंद्री कथा

बाबाराव मा. ठावरी
भगवंतराव कला महाविद्यालय सिरोंचा
*Corresponding Author: babaraothawari@gmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :**

विनोदी साहित्य लेखिकांमध्ये आपल्या स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटविणा-या लेखिका म्हणून मंगला गोडबोले यांचे नाव घेतले जाते. त्यांनी आपल्या लेखनाच्या सुरूवातीपासून काही गंभीर स्वरूपाची कथाही लिहिलेल्या आहेत. त्यांचे कथालेखन १९८० मध्ये प्रकाशित झाले त त्यांचे ‘आरंभ’. ‘आरंभ’ पासून सुरूवात करीत २०१६ पर्यत त्यांनी दिवाळी अंकातूनही आपल्या कथा प्रकाशित केल्या आहेत. या कथांना खूप प्रसिध्दी मिळाली आहे. त्यांच्या कथांची कानडी, बंगाली आणि इंग्रजी भाषांमधून भाषांतरे झाली आहेत. इतकेच काय त्यांच्या कथांची नभोनाटय रूपांतरे ही आकाशवाणीवरून प्रसारित झाली आहे.

मंगला गोडबोले यांच्या कथांचे लेखन काळाबरोबर राहिले आहे. गेल्या चार दशकात सामान्य शहरी माणसांची जीवनशैली, त्यांच्यातील संवेदनशीलता, त्याव्यक्ती आणि भोवतालच`विश्व यात रोज नव्याने निर्माण होण्या-या गुंतागुंती, मागे सरत असलेला विचारांचे आदानप्रदान हे त्यांच्या चिंतनाचे विषय राहिले आहेत. या अनुभव विश्वाच्या केंद्रस्थानी शहरी मध्यमवर्गीय स्त्री दिसून येते. त्यामुळे त्यांच्या कथांचा परीघ कुटुबंथांचा असल्याचे दिसून येईल. या कुटूंबकथांत पती-पत्नी, मुले-मुली, आई-वडील, सासू-सासरे, सून-भावजयी, नातवंडे-वृध्द अशा विविध कौटुंबीक नात्यांचे आपणास दर्शन घडते. इतकेच नव्हे तर त्यांच्या काही कथातून, शेजारी, मैत्रिणी, मित्र, मोलकरणी हेही नात्याच्या पलिकडे असलेली दिसून येतात. मानवी संबंधातील सुष्ट-दुष्ट धाग्यांची वीण त्यांच्या कथांमधून आपणास पहावयास मिळाते. कल्पनाशक्ती आणि प्रतिमा या लेखिकेला मिळालेल्या दैवी देणग्या आहेत. मंगला गोडबोले यांनी आपल्या कथांतून दोन भिन्न प्रकृतीच्या स्त्रियांचे त्यांच्या नानाविध वर्तनाच्या बारकाव्यासह दर्शन घडविले आहे. यात कुठलाही त्यांच्या शैलीला अलंकरणाचा, प्रतिभा युक्ततेचा सोस नाही. स्त्रीजीवनाशी संबंधित आशयसूत्राच्या साहयाने मानवीजीवनाचा त्या शोध घेताना दिसतात. मंगला गोडबोले यांनी बायकांच्या जगण्यावर आपल्या कथांतून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांविषयीची आत्मियता असली तरी त्या स्त्रीवादी नसल्याचे सांगताना पण त्यांचा बहुतेक कथा ‘स्त्रीकेंद्री’ असल्याचे आपणास दिसून येते. स्त्रियांच्या सुखदु:खाशी, संदर्भाशी, भाषेशी त्या सहजपणे नातं जोडताना दिसून येतात. त्यांनी अशा कथांतून अनेक प्रसंगाच्या सहयाने विस्तारीत जीवनाचे जणू सूचनच केले आहे. त्यांच्या अशा कथांतील ग्रंथित झालेला विचार अनेकांना प्रेरणादायी ठरू शकेल.

**बिजसंज्ञा:–** मंगला गोडबोले नभोनाट्य कुटुंबकथां ‘मध्यम’
:

विनोदी साहित्य लेखिकांमध्ये आपल्या स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटविणाऱ्या लेखिका म्हणून मंगला गोडबोले यांचे नाव घेतले जाते. त्यांनी आपल्या लेखनाच्या सुरूवातीपासून काही गंभीर स्वरूपाच्या कथाही लिहिलेल्या आहेत. त्यांचे कथालेखन १९८० मध्ये प्रकाशित झाले ते त्यांचे ‘आरंभ’. ‘आरंभ’ पासून सुरूवात करीत २०१६ पर्यंत त्यांनी दिवाळी अंकातूनही आपल्या कथा प्रकाशित केल्या आहेत. या कथांना खूप प्रसिध्दी मिळाली आहे. त्यांच्या कथांची कानडी, बंगाली आणि इंग्रजी भाषांमधून भाषांतरे झाली आहेत. इतकेच

काय त्यांच्या कथांची नभोनाट्य रूपांतरेही आकाशवाणीवरून प्रसारित झाली आहेत.

याठिकाणी त्यांच्या सर्वच कथांचा परिचय करून देता येणार नाही. त्यांच्या कथांचे लेखन काळाबरोबर राहिले आहे. गेल्या चार दशकात सामान्य शहरी माणसांची जीवनशैली, त्यांच्यातील संवेदनशीलता, त्या व्यक्ती आणि भोवतालचे विश्व यात रोज नव्याने निर्माण होणाऱ्या गुंतागुंती, मागे सरत असलेले विचारांचे आदानप्रदान हे त्यांच्या चिंतनाचे विषय राहिले आहेत. म्हणूनच या माणसांचे अनुभवविश्व बारीकसारीक तपशीलासह मोठ्या आस्थेने त्या चित्रित करतांना दिसतात.

या अनुभव विश्वाच्या केंद्रस्थानी शहरी मध्यवर्गीय स्त्री दिसून येते. त्यामुळे त्यांच्या कथांचा परीघ कुटुंबकथांचा असल्याचे दिसून येईल. या कुटुंबकथांत पती-पत्नी, मुले-मुली, आई-वडिल, सासू-सासरे, सून-भावजयी, नातवंडे-वृध्द अशा विविध कौटुंबिक नात्यांचे आपणास दर्शन घडते. इतकेच नव्हे तर त्यांच्या काही कथांतून शेजारी, मैत्रिणी, मित्र, मोलकरणी हेही नात्याच्या पलिकडे असलेलेही दिसून येतात. ते नातेवाईक नसले तरी आपले लक्ष वेधून घेतात हे मात्र निश्चित. एवढेच काय तर आपल्या नातवंडाच्या शाळेतील बाई-सर, कार्यालयातले सहकारी अशी घरापलिकडची नातीही त्यातून दिसून येतात.

शहरी जीवन म्हटले की, कामानिमित्त दूरवर घराबाहेर पडावेच लागते. अशा स्त्री-पुरूषांचा अन्य व्यक्तींशी येणारा संबंध, त्यातून उभे ठाकलेले प्रश्न यांचाही विचार या कथाविश्वातून आलेला आहे. मानवी संबंधातील सुष्टदुष्ट धाग्यांची वीण या कथांमधून आपणास पहावयास मिळते. कल्पनाशक्ती आणि प्रतिभा या लेखिकेला मिळालेल्या दैवी देणग्या आहेत. जर्मन महाकवी गटे यांचे कल्पनाशक्तीबद्दलचे प्रतिपादन येथे अप्रस्तुत ठरू नये. “Imagination should not deal in facts, nor be employed to establish facts. It's proper province is art and there its influence should operate the sweet music, which awakens our emotions and make us forget the cause by which these emotions are awakened

यावरून सत्य प्रस्थापित करणे हे कल्पनाशक्तीचे काम नसते; तर या कल्पनाशक्तीचा खरा गाभा कला आहे. त्यातूनच भावनांची जागृती करता येते. यातून निर्माण झालेल्या साहित्याचे मूल्य समाजातील एक सर्जनशील कार्य आणि एक स्वतंत्र कलात्मक निर्मिती असे असते. त्यातूनच वाचकांना अनुभव समृध्द करण्याचे कार्य घडत असते.

तसं पाहता वाचक आणि लेखिका/लेखक दोघेही एकाच जगात जगत असतात. फक्त लेखक/लेखिकेच्या मनाची पातळी खूप उंचीवर असलेल्या ‘ॲंटिना’ सारखी असते. म्हणूनच त्यांच्या मनात कथेचे बीज चटकन

तयार होते. त्यातून कथेला आकार मिळतो आणि एक चांगली कथा निर्माण होते. वाचक त्याच्याशी सहजपणे जोडला जातो. म्हणूनच आपण असे म्हणू शकतो की, त्यातल्या कथेचं जग आपलंच आहे. ते आम्ही पाहिलेलं, अनुभवलेलं आहे. याच वाचकातल्या खूप गोष्टी महिनान् महिने लेखिकेच्या मनात घर करून राहतात, त्याची सारखी डोक्यात घालमेल सुरू असते. पात्रांची नावे, मांडणी, आसपासचा भौगोलिक परिसर, त्यांचे बोलणे, त्यांचे नातेसंबंध या सर्व मुद्यावर उहापोह होतो. त्याची मनातच जुळणी झाली की, एक छानशी कथा तयार होते.

लेखिका मंगला गोडबोले यांनी बायकांच्या जगण्यावर आपल्या कथांतून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांविषयीची आत्मियता असली तरी त्या 'स्त्रीवादी' नसल्याचे सांगतात. पण त्यांच्या बहुतेक कथा 'स्त्रीकेंद्री' असल्याचे आपणास दिसून येते. स्त्रियांच्या सुखदु:खाशी, संदर्भाशी, भाषेशी त्या सहजपणे नातं जोडताना दिसून येतात.

स्त्रीजीवनातले जिवंत असलेले प्रश्न त्यांनी आपल्या कथांमधून प्रदर्शित केल्याचेही दिसून येते. स्त्री ही कितीही प्रौढझाली तरी तिची आई जिवंत असेपर्यंत ती 'मुलगी'ही असते. याचा प्रत्यय मंगला गोडबोले यांच्या 'डांग' या कथेत येतो. मुलीच्या आजोबांना पांढरे कोड आहेत, यामुळे तिचे लग्न जुळत नाही, म्हणून व्याकुळ झालेली उमाची म्हणजे मुलीची आई पाहिली की मुलीच्या जडणघडणीत आईचा वाटा फार मोठा असतो याचा प्रत्यय येतो. 'डाग' या कथेतील उमाची आई आशावादी आहे. म्हणूनच ती उमाला म्हणते –'' तुझ्या बरोबरीच्या मुलींची लग्नं झाली. त्यांना मुलं झाली, तरी तू अशीच राहिलीस .... बाहेर लोक कुजबुजतात .... पण मीपण जिद्दी आहे. त्या कागलकरांशी सगळं जमविल्याशिवाय राहणार नाहीये .... मग त्यासाठी मला आकाशपाताळ एक करावं लागलं तरी चालेल. एकदा तुझ्या डोक्यावर अक्षता पडल्या की मी मरायला मोकळी.''

मंगला गोडबोले यांच्या 'सोबत' या कथासंग्रहातील 'जीव' ही कथाही नलू या गंभीर महिलेची आहे. आपले आवडते भाऊसाहेब वयाने वृध्द असले तरी घरच्यासारखे नलू आणि तिच्या नवऱ्यावर लोभ करणारे. ते गेल्यावरचं जेव्हा तिला कळतं तेव्हा नवरा एका कॉन्फरन्स्साठी दिल्लीला गेलेला असतो. स्वत:च्या बाळंतपणाच्या वेळेची काळजी न ती त्याला परस्पर त्यांच्या भेटीला पाठवते. त्यावेळी तिची झालेली घालमेल अतिशय जिवंतपणे कथेतून चित्रित करतात.

लेखिका मंगला गोडबोले आपल्या कथांमधून मुलगी म्हणून जन्माला आल्यापासून ते वृध्दावस्थेपर्यंतचे स्त्रीजीवनाचे वेगवेगळ्या टप्प्यावरचे चित्रण करतात. त्यांची 'कोपरा'

या कथासंग्रहातील 'बच्चा' ही कथा हॉस्पिटलची पार्श्वभूमी लाभलेली असली तरी त्यात निरू या गृहिणीची, एक मुसलमान म्हातारी आणि तिची नात झुबेदा यांची आहे. समाजात माणसे कशी असतात. त्यांना फक्त आपल्या पत्नीपासून मूल पाहिजे असते. मूल जर होऊन गेलं तर पुरूषाची चिडचिड अधिकच वाढते आणि त्याचा ताण त्या स्त्रीवर पडतो. नको ती बोलणी तिला ऐकावी लागतात. सारं सासर परक्यासारखं वागायला लागते. स्त्रीची ही आगतिकता या कथेतून लेखिका मंगला गोडबोले जिवंतजपणे चित्रित करतात.

मंगला गोडबोले यांच्या 'मध्यम' या कथासंग्रहातील :'पार्टी नंबर वन' ही कथाही स्त्रीपात्रांनी नटलेली आहे. इथेही हॉस्पिटलच्या पार्श्वभूमीतून कथा फुललेली आहे. आई-वडिल, आजी, अंजू आत्या आणि ऋचा व घरकाम करणारी कौसल्या अशी मोजकी पात्रे यात दिसून येतात. आजीची म्हातारपणामुळे हॉस्पिटलमध्ये रवानगी, तिची आई-बाबांनी घेतलेली काळजी, अंजू आत्याचे बाळंतपणाच्या प्रतिक्षेतले भरलेले दिवस आणि ऋचाच्या शाळेतलं मुलामुलींचं प्रेमप्रकरण एवढ्या साऱ्या चित्रणातून मंगला गोडबोले यांनी कथेला आकार दिला आहे. यातून स्त्रीवर्गाला अधिक प्राधान्य देत संवादरचना केलेली आहे.

तसंच 'गिरकी' या कथासंग्रहातील 'बोट' नावाच्या कथेतील वयस्क पमआत्याच्या ख्यालीखुशालीचे चित्रण मोठे सुखद वाटते. मुलगा जर्मनीला बदलून जायचा असतो. तेव्हा सारं बिऱ्हाड जर्मनीला जाण्याआधी पमाआत्याच्या नातलगांच्या, गाठीभेटी, राधा-रमाकांत यांचा सुखावह संसार हे सारं मोठ्या खेळीमेळीनं लेखिका चित्रित करतात. मंगला गोडबोले आपल्या कथेची मांडणी इतकी निटनेटकी आणि सहजतापूर्ण करतात की, वाचकानेही त्यांचे कौतुक करावे अशी. कथेचा तोल सर्वतोपरी सांभाळण्याचे त्यांचे कसब वाखाणण्यासारखे आहे. त्याचा उत्तम नमुना म्हणजे त्यांची 'आरंभ' या १९८० मध्ये प्रकाशित झालेल्या कथासंग्रहातील 'न्याय' ही कथा होय. यात धडधाकड दारूड्या नवऱ्याशी संसार करीत असतांना मेटीकुटीला आलेली यशोदा यात चित्रित केलेली आहे. तिचा बापही दारूड्याच म्हणून तिची आई नवऱ्याच्या जाचाला कंटाळून गेलेली. लग्न झाल्यापासून वर्षाआड एक या गतीनं मूलं निपजली आणि मशागत करण्याएवढी ती मोठी होईपर्यंत सगळी जमीनच हातची गेली. तिच्या बापानं नाना धंदे करून पाहिले, पण एवढ्या पसाऱ्यासारख्या कुटुंबाला पोटभर अन्नही देता आले नाही. शेवटी कुटुंबाची फिकिर न करता थकू लागलेल्या आपल्या देहातल्या 'जवानी' चे चोचले पुरवू लागला. रात्री खंबीरपणे बाहेर पडायचा आणि सकाळी कोणत्यातरी गटाराजवळ बेहोश पडलेला असायचा. बापाकडे अशी परिस्थिती आणि

यशोदा लग्न होऊन भीमाप्पाकडे आल्यानंतरही अशी परिस्थिती. "भीमाप्पाशी लग्न झाल्यापासून गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये हजारदा जीव द्यावासा वाटला होता. पण प्रत्यक्ष जीव जाण्याची वेळ आली तेव्हा मात्र .... कोठून संचारलं. एवढं बल अंगात?....... मरणाच्या भीतीनं की जगण्याच्या मोहानं? पण मोह पडावा असं यशोदेच्या आयुष्यानं तिला काहीच दिलं नव्हतं. गरिबाच्या घरात मुलीचा जन्म म्हणजे आयुष्याची सुरूवातच मुली कोणाच्या तरी नाराजीतून 'शिकून मामलेदार का होयाचं?' म्हणून शिक्षणाचा गंध नाही. आणि तरणी पोर गळ्याचा फास' म्हणून तरूण होण्यापूर्वीच लग्न. तेही भीमाप्पासारख्याशी.'' राठ केस, उग्र डोळे आणि बसकी मान असलेला भीमाप्पा पहिल्यापासूनच तिला आवडला नव्हता. पण यशोदा त्याला आता जुमानेशी झाली होती. त्याच्या या त्रासातून सुटण्यासाठी तिने व त्याने अवघ्या संसाराचा संग्राम बनवून टाकला होता. एकदा सकाळी लडबडत्या पायानं भीमाप्पा घरी आला तेव्हा त्याची नेहमीची मागणी होती. यशोदेनं नेहमीप्रमाणे नकार दिल्यावर त्याने नेहमीचा पवित्रा घेऊन म्हटले- "लग्नाची बायको तू आन् हात लावू नगंस म्हणतेस?'' तुझ्या सारख्याचं पोर वाढविण्यापेक्षा विष खाईन असे त्यावर ती उत्तर देते. मनानं घरी परतावं लागलं की, भीमाप्पा यशोदेपासून जे हक्काचं होतं ते वसूल करण्याचा प्रयत्न करी. यातच बाचाबाची होऊन दाराची कडी उघडून ती चौकीच्या दिशेने धावत सुटली. आणि तिने त्याला ढळढळीत पुराव्यासह हवालदाराच्या स्वाधीन केले. पण यशोदेच्या बापाच्याच मदतीने जामिनावर तो शेवटी सुटतो. तेव्हा ती हतबल होऊन म्हणते- 'बापानं जामीन भरला- जन्मदात्यानं?' तिला आपली सगळी धडपड निरर्थक वाटली. मग न्याय कोणाजवळ मागायचा? म्हणून तिने परिस्थितीशी जुळवून घेतले. या कथेचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे निवेदक स्वत: बाजूला राहून पात्रांनाच बोलू देतो. पात्रमनाचेच हे दर्शन म्हणता येईल. अशा कथा म्हणजे भाषेतून उभे राहिलेले कल्पित विश्वच म्हणावे लागेल. त्याचे अस्सलपण आपल्यास नाकारता येणार नाही.

गेल्या तीस-चाळीस वर्षात अनेक कुटुंबबाह्य क्षेत्रात स्त्रियांनी दखल घेण्याजोगी कामगिरी बजावली आहे. अशाही वातावरणात रूळलेल्या पुरूष व स्त्रियांचेही चित्रण साहित्यात- कथेत दिसून येते. आजही स्त्रीचे बहूंशी जगणे कुटुंबसापेक्ष आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मंगलाबाई गोडबोले यांच्या कथेतील अनेक स्त्रिया शिक्षिका, प्राध्यापिका, लेखिका, कलावंत आहेत. त्या शाळा-महाविद्यालय यातून काम करतात. कामाचा व्याप त्यांनाही असतो. त्यामुळे त्यांच्या मनावर काही प्रमाणात ताण असतोच, तो त्या आपल्यापरीने जमेल तसा सोशीत असतात. अशा ताण सोसणाऱ्या,

परिस्थितीसमोर वाकणाऱ्या स्त्रिया फारशी सहानुभूती मिळवित नसतात, हे वस्तुस्थिती आहे, हेच सर्वसामान्य वास्तव आहे. सर्व सामान्य स्त्री व्यवहार्यता, लवचिकता दाखवितच आलेल्या परिस्थितीला तोंड देत मार्ग काढीत असते. सामान्य स्त्रीमधले हे सुप्त सामर्थ्य मंगलाबाई गोडबोलेंनी स्त्रीपात्राच्या चित्रणातून प्रकट केले आहे. स्त्रीच्या दुसऱ्या स्त्रीशी असणाऱ्या कुटुंबसापेक्ष आणि समाजसापेक्ष संबंधाच्या चित्रणातून सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाचेही मार्मिक दर्शन घडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. याबाबतीत त्यांच्या 'गिरकी' या कथासंग्रहातील 'गिरकी' ही कथा उदाहरण म्णून सांगता येईल.

'गिरकी' या कथेत दोन भिन्न प्रकृतीच्या, भिन्न वयाच्या पण एकाच व्यवसायात असलेल्या, भिन्न विचाराच्या अशा दोन स्त्रिया आपणास पहावयास मिळतात. दोघीही वेगवेगळ्या महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या महिला. यातील सुळेबाई या वयाने पोक्त अशा. एक वर्षाने सेवानिवृत्त होणाऱ्या तर मैथिला या जीवनाचा पुरेपर आनंद उपभोगणाऱ्या, स्वच्छंदी, आपल्या घराविषयी- मूल आणि नवऱ्याविषयी तितकाच जिव्हाळा असलेली पण आपली हौसही पुरेपर सांभाळणारी अशी महिला आहे.

सुळेबाई या एका कॉलेजमध्ये प्राध्यापिका आहेत. घरी मात्र त्या एकट्याच. या एकटेपणाची त्यांना आता सवय झालेली आहे. सुळेबाई म्हणजे 'संसाराच्या लिप्ताळ्यात न अडकलेला जीव!' त्यांची नोकरी, त्यांच्या परिषदा, मेळावे, अभ्यासवर्ग, सभासंमेलन-लेखन-वाचन यातच त्यांची सारी हयात गेलेली. सोसायटीत फारसं कोणाशीही काम नसायचं. त्यांना एकदा सेमिनारसाठी गोव्याला जायचं होतं. त्यासाठी पेपरचा गोषवारा, टिपण काढून त्यांनी तत्परतेनं पाठवूनही दिलं होते. पण त्या पेपरवर विचारमंथन मात्र गोव्याला जाईपर्यंत सुरूच होतं. सेमिनारमध्ये पेपर वाचनाचा विषय त्यांच्या आवडीचाच होता. 'लेखिकांना जाणवणारी सामाजिक बंधने! उघडछुपी सेन्सारशीप'! गोव्याला जाईपर्यंत त्यांनी भरपूर तयारी केली होती.

गोव्याला तेथील विद्यापीठात सुळेबाई सेमिनारला गेल्या. विद्यापीठाने त्यांची राहायची सोयही केली होती. खोलीचं दार उघडताच सेंटचा उग्र भपकारा आत घुसला. त्याच खोलीत एका सुबक, सुडौल, अद्ययावत अशा मैथिली नावाच्या प्राध्यापिकेचीही राहण्याची व्यवस्था केली होती. मैथिला या सुर्वोदय युनिव्हर्सिटीतल्या प्राध्यापिका होत्या. चाळीशीच्या आतल्या वयाच्या हातात दिमाखदार पर्स, झुळझुळीत ऐटबाजपणे साडी नेसलेली. नटण्याची फार हौस असलेली अशी ती प्राध्यापिका. त्यांनाही सेमिनारमध्ये पेपरचं वाचन करायचं होतं. सुळेबाईंची पेपरवाचनासाठी कितीतरी दिवसापासूनची

तयारी तर मैथिलीची संदर्भासाठी पुस्तके मिळत नसल्याची बोंब. पेपरचं वाचन करून कशीतरी वेळ मारून न्यायची तयारी होती. चार प्राध्यापक/प्राध्यापिका पेपरचं वाचन करतील तेव्हा आपल्यालाही काही सुचेल असा दांडगा आत्मविश्वास त्यांना होता. बाकी सेमिनारमध्ये नावापुरते सहभागी होऊन त्यानिमित्ताने घडणाऱ्या प्रवासाची, तेथील मार्केटिंगची मौज- मजा उपभोगणे यात त्यांना अधिक रस होता. आपल्या समविचाराच्या चार प्राध्यापिका जमवून ती हौस पूर्ण करायची असा नेहमीच त्या विचार करीत. आपल्या पेपरवाचनात सारखे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या ख्यातनाम व्यक्तींचे दाखले देणे, प्रसिध्द अशी अवतरणे देणे व त्यातून फुटकळ विनोद साधून रसिकांची दाद मिळविणे हे त्यांना फार जमत असे. आणि रसिक प्रेक्षकही त्याला भरपूर दाद देत असत. याउलट सुळेबाई प्राध्यापकी देशातल्या दीर्घ अनुभवी. बोलण्याचा दांडगा सराव, विचारांची पक्की बैठक, संयम, चौफेर दृष्टिकोन यामुळे त्यांचं पेपरवाचनावर पूर्ण नियंत्रण होतं.

अशा दोन भिन्न विचारांच्या स्त्रियांचं दर्शन या कथेत मंगलाबाई गोडबोले यांनी घडविले. आपणच आपले व्याप वाढवायचे आणि ते निस्तरतही बसायचे हे मैथिलीला न पटण्यासारखे होते. जीवन शिस्तीतच घालवायचं पण आपल्या हौशी-गरजा यांना मात्र मुरड घालायची नाही. हा मैथिलीचा जीवनविषयक दृष्टिकोन होता. सुळेबाईंना हे सर्व पाहून आपल्या जीवनाला आपण कधी कंटाळल्याचं वाटायला लागलं. पण त्यांचं दुसरं मन मात्र म्हणत होतं की, आपण आपल्या जीवनाला जी शिस्त लावली, ती मोडता कामा नये.

पण आजच्या जगात सुळेबाईसारखा आदर्श काय कामाचा असं म्हणणाऱ्यांची संख्या जास्तच जाणवले. उलट मैथिलीचा व्यवहारदक्षपणा, वेळ मारून नेण्याची पध्दत, याकडे दुर्लक्ष करून त्या आपल्या कौटुंबिक गरजांची पूर्तता करणाऱ्या स्वार्थीपणाला दाद देतील. म्हणून मैथिली म्हणते- "असू दे हो. त्या निमित्तानं जाणं .... होतयं .... गेल्यासारखी काही थोडीफार खरेदी करता आली तर बघावी म्हणते. अशोकला (नवरा) काजू इतके आवडतात ना! सोनूला (मुलाला) शांता दुर्गेचा प्रसाद न्यायचा होता, म्हणून आले कडमडत, आधीच ते आमचं उशिरा झालेलं मूल .... त्यात प्रकृतीनं नाजूक ..." मंगला गोडबोले यांनी या कथेतून दोन भिन्न प्रकृतीच्या स्त्रियांचे त्यांच्या नानाविध वर्तनाच्या बारकाव्यासह दर्शन घडविले आहे. यात कुठलाही त्यांच्या शैलीला अलंकरणाचा, प्रतिभायुक्ततेचा सोस नाही. स्त्रीजीवनाशी संबंधित आशय सूत्राच्या साह्याने मानवी जीवनाचा त्या शोध घेताना दिसतात. त्यांनी अशा कथांतून अनेक प्रसंगाच्या साह्याने विस्तारीत जीवनाचे जणू सूचनच केले आहे. डॉ. गो.मा. पवार यांनी मंगला गोडबोले

यांच्या लेखनासंदर्भात जे म्हटले आहे ते यथार्थ वाटते. ते म्हणतात – ‘‘त्यांचा एकूण स्त्रीजीवनाबद्दल सहानुभूतिपूर्ण दृष्टिकोन आहे. समाजरचनेत स्त्रीवर होणारे भावनिक अन्याय, उपेक्षा, शोषण ह्यांचा वेध घेताना नेहमीच वरच्या पट्टीतला सूर लावण्याची गरज नसते; मिश्किल पध्दतीनेही स्त्रीचे सोसणे मांडता येते, हे त्यांच्या लेखनातून जाणवते. त्यांच्या अशा कथांतील ग्रंथित झालेला विचार अनेकांना प्रेरणादायी ठरू शकेल. पुष्कळदा लेखक/लेखिका असे म्हणतात की, जीवन हे एक लढाई आहे, संघर्ष आहे’, ’तम अल्प द्युति बहु’. यातून लेखिकेने आपले जीवनविषयक सत्यच सांगितले आहे असे म्हणता येईल. मंगला गोडबोले यांनीही आपल्या कथांतून जीवनातले सत्य विशद केल्याचे दिसून येईल.

**संदर्भ :–**

आराधना कुळकर्णी, प्रतिष्ठान, सप्टेंबर–ऑक्टोबर, २०१३ पृ. ३९.
मंगला गोडबोले, प्रवेश (कथासंग्रह), प्रथमावृत्ती, नवचैतन्य प्रकाशन, २०१०.
मंगला गोडबोले, ‘आरंभ’ (कथा– न्याय), मेनका प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९८०.
मंगला गोडबोले, ‘गिरकी’ (कथासंग्रह), उत्कर्ष प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २००६.
गो.मा. पवार, मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे प्रकाशन, पृ. ३२९.